# जिल्हा परिषद, उस्मानाबाद

# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. उस्मानाबाद

# अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) फॉर्म

**कामाचे नाव :-** जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामाकरीता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, सादरीकरण करणे, तांत्रिक मान्यता, प्रशासकिय मान्यता घेणे व कार्यारंभ आदेश निर्गमीत करणेसाठी तांत्रिक सल्ला व सहाय्य प्रदान करणे.

तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार व पत्ता :- ---------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद

# अभिव्यक्ती स्वारस्य सुचना

## (EXPRESSION OF INTEREST)

कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद हे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांच्या वतीने जलजीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांचे सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके तयार करणे, सादरीकरण करणे,तांत्रिक मान्यता घेणे, प्रशासकीय मान्यता घेणे व कार्यारंभ आदेश निर्गमित करणेसाठी तांत्रिक सल्ला व साहाय्य करणे इत्यादि बाबीसाठी दर निश्चित करून दर करार करणेसाठी इच्छुक अभियंत्यांचे/तांत्रिक सल्लागार संस्था/कंत्राटदाराचे Panel (समुह) तयार करण्यासाठी इच्छुक अभियंत्यांनी/संस्थांनी सोबतच्या प्रपत्र अ नुसार आवश्यक माहिती, कागदपत्रे ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद या कार्यालयास प्रत्यक्ष अथवा eebnosmanabad@gmail.com या मेल आयडी वर सादर करावीत.

**अटी व शर्ती**

१. वरील कामाची सुचना ऑनलाईन पध्दतीने दि. २३/०४/२०२२ सकाळी ११.०० वा. ते दि. ०३/०५/२०२२ संध्या.१७.०० वा या कालावधीत https://zposmanabad.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.
२. सदर सुचनेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करणे व दरपत्रक कोणतेही कारण न देता प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
३. प्रपत्र अ मधील अटी पुर्ण करणा-या व पात्र ठरणा-या तांत्रिक सल्लागार संस्थाची / कंत्राटदाराची निवड करण्यात येईल.
४. तांत्रिक बाबीमध्ये अपात्र ठरलेल्या तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचेसोबत कसलाही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.
५. जी.एस.टी. बाबत वेळोवेळी निर्गमीत होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, शासन अध्यादेश शासन पत्रे बंधनकारक राहील.
६. तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराने विहित नमुन्यातील प्रस्ताव आवेदनपत्र सादर करतांना कागदपत्रे सादर करण्या पुर्वी स्वतः कागदपत्रावर पृष्ठ क्रमांक नमूद करून पृष्ठांकीत करुन सादर करावीत.
७. नळ पाणी पुरवठा योजनेचे सर्वेक्षण करून अंदाजपत्रके व आराखडे कार्यारंभ आदेश दिल्यापासून टप्याटप्प्याने 1 महिन्याचे आत सादर करणे बंधनकारक राहील.
८. निविदा स्पर्धेतून माघार घेतल्यास दंडात्मक कार्यवाही :- तांत्रिक लिफाफ्याच्या पडताळणी अंती पात्र कंत्राटदारानी माझा आर्थिक देकार उघण्यात येऊ नये अथवा मी स्पर्धेतून माघार घेत आहे. असे पत्र दिल्यास ते स्पष्टपणे नाकारण्यात येऊन त्याचा आर्थिक देकार उघडण्यात येईल व संबंधित ठेकेदारावर निविदा मुल्यांकन समिती दंडात्मक कार्यवाही करु शकते.

### कामाच्या अटी व शर्ती

**अ) तांत्रिक कामाचा अनुभव / पात्रता** :

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण /जिल्हा परिषद /महानगरपालिका /नगरपरिषदेमध्ये यापूर्वी किमान एका गाव / शहरासाठी नळ पाणी पुरवठा योजनेचे सर्वेक्षण करुन संकल्पन अंदाजपत्रके व आराखडे तयार केले असल्याबाबत सक्षम अधिका-यांचे अनुभव प्रमाणपत्र (Not below the rank of Executive Engineer / Chief Officer of Municipal Council/ Commissioner of Municipal Corporation).
२. कंत्राटदार / सल्लागार यांचेकडे अनुभवी भूवैज्ञानिक व स्थापत्य अभियंत्यासह उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाची यादी निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे.
३. सदर कामासाठी संबंधित व्यक्ती /संस्था ही मजीप्रा / जि.प. / सा.बां/जलसंपदा / सिडको/ एमआयडीसी व तत्सम शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत असावा. Joint Venture / Collaboration ग्राहय धरण्यात येईल.

४. सदर कामासाठी संबंधित व्यक्ती / संस्था यांच्याकडे उपलब्ध सर्वेक्षण संसाधनांची यादी (जसे सर्वेक्षण साहित्य, वाहन इ. मालकी हक्क पुराव्यासहित), उपलब्ध तांत्रिक मनुष्य बळाची यादी, प्रसिध्द केलेल्या खालील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र, पॅन कार्ड, सन २०२१-२०२२ चे आयकर भरल्याचे विवरणपत्र, वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५. प्रपत्र अ नुसार

**ब) कामाची व्याप्ती (Scope of work) :**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन विभागाच्या मार्फत जलजीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषदेमार्फत अंमलबजावणी करावयाच्या वार्षिक कृती आराखडा सन 2021-22 व सन 2022-23 मधील रेट्रोफिटींग व नवीन नळ पाणी पुरवठा योजनांचे सर्वेक्षण करणे, संकल्पन, नकाशे करणे, अंदाजपत्रके व सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणे, सादरीकरण करणे व तांत्रिक, प्रशासकिय मान्यता प्राप्त करुन घेणे, डी.टी.पी , बी.ओ.क्यु. तयार करणे, ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन कार्यारंभ आदेश निर्गमीत करणे कामी तांत्रिक सल्ला व सहाय्य सेवा देणे इ.

**क) देयकाची अदायगी व कामाचे वाटप :**

१. सदर कामासाठी योजनेच्या अंदाजपत्रकिय किंमतीच्या (प्रशासकीय मान्यता रकमेच्या) ०.८% दराने तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचा मोबदला अदा करण्यात येईल.

२. सदरचा खर्च जल जीवन मिशन सन २०२१-२०२२ व सन 2022-23 अंतर्गत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सहाय्य निधीतून रक्कम उपलब्धतेनुसार होत जाईल व त्यानुसार कामाबाबत देयक अदायगी करण्यात येईल. अंदाजपत्रकास शासन स्तरावरील अथवा मुख्य / अधीक्षक अभियंता मजीप्रा स्तरावरील तांत्रिक छाननी समितीची मंजुरी व प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर कार्यारंभ आदेश निर्गमीत केल्यानंतर अभियंत्यांचा/तांत्रिक सल्लागार संस्थेचा/कंत्राटदाराचा मोबदला निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल.

३. काम कोणत्याही टप्प्यावर/पुर्णतः रद्द करण्याचे अथवा केवळ कामाच्या अंशिक भागासाठी कार्यारंभ आदेश देण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी राखून ठेवले आहेत.

४. कार्यारंभ आदेश प्राप्त करण्यापुर्वी वाटप करण्यात आलेल्या एकुण कामाच्या मंजूर दरानुसार देय रक्कमेच्या 2 टक्के एवढी सुरक्षा अनामत रकमेचा धनाकर्ष (डीडी) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. उस्मानाबाद यांचे नावाने जमा करावी लागेल.

५. सदर कामासाठी मंजूर दरानुसार पूर्ण जिल्हयामध्ये काम करण्यास तयार असलेल्या पात्र तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचे पॅनल तयार करण्यात येईल. त्यानुसार कामाची विभागणी करुन कामाचे मंजूर दराने तालुकानिहाय आदेश देण्यात येतील. त्या करीता संबंधित तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांनी रु. ५००/- च्या बॉंडपेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

६. पॅनेल तयार करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असतील.

**ड) अंदाजपत्रक तयार करतांना खालील बाबींचे अनुपालन आवश्यक राहिल :**

१. कंत्राटदारास/सल्लागारास आराखडयात प्रस्तावित कामे किमान खर्चाच्या निकषात तसेच Cost per Capita च्या निकषात बसवण्याचा प्रयत्न करावा लागेल अन्यथा वाढीचे स्वयंस्पष्ट तांत्रिक समर्थन संबधित उपअभियंता यांचेमार्फत सादर करावे लागेल.

२. भुस्तर / Strata Classification साठीचे Trial Pits घेणे अनिवार्य राहिल.

३. तांत्रिक छाननी समितीच्या सादरीकरणातील उपस्थित मुद्यांचे समर्थनिय निराकारण करणे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेशापर्यंतची प्रक्रिया होई पर्यंतच्या त्रुटीची पुर्तता करण्याची जबाबदारी तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराची राहिल. तसेच, शासन पाणी पुरवठा विभागाकडील प्राप्त पत्र दि. 1.2.2021 मधिल मुद्यांची व यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक/पत्रानुसार पूर्तता करणे बंधनकारक राहील.

४. उध्दरण नलिका/वितरण व्यवस्थेवर अनुक्रमे प्रत्येक 200 मी. अंतरावर व 500 मी. अंतरावर Trial Pitsघेवून त्याचे नोटकॅम फोटो सादर करणे.

५. प्रस्तावित विहिरीच्या स्थळाचे व टाकीच्या स्थळाचे नोटकॅम फोटो सादर करणे बंधनकारक राहिल. विहीर / टाकीची/ जलशुद्धीकरण केंद्राची जागा सरकारी असल्यास 7/12 / ग्रामपंचायत नमुना 8अ व खाजगी जागा असेल तर संमतीपत्र किंवा नोंदणीकृत दानपत्र/ बक्षीसपत्र असणे आवश्यक आहे.

६. प्रस्तावित व अस्तित्वातील उपांगे दर्शविणारे Google Map जोडणे अनिवार्य राहील.
अ. प्रस्तावित कामे लाल रंगाने दर्शविणे.
आ. अस्तित्वातील कामे हिरव्या रंगाने दर्शविणे.

७ सर्वेक्षणाच्या वेळेस संबंधित शाखा अभियंता / उप अभियंता यांना सोबत घेऊन अभिलेख्यावरील/ अंदाजपत्रकावर / आराखड्यावर त्यांच्या तपासणी केलेबाबत (Checked by me) म्हणुन स्वाक्ष-या घेणेची जबाबदारी तांत्रिक सल्लागाराची राहील.

८ अंदाजपत्रके व आराखडे सादर करतांना त्यात खालील Drawing चा समावेश असावा व अंदाजपत्रक हे शासन स्तरावरील अथवा मुख्य अभियंता स्तरावरील तांत्रिक छाननी समितीने अंतिम मान्यता दिल्यानंतर आवश्यक दुरूस्ती करून अंदाजपत्रकाच्या अंतिम ३ प्रती सादर करण्याची जबाबदारी संबंधित तांत्रिक सल्लागाराची राहिल.

९ सर्वेक्षणासाठी Total Station / DGPS / Auto level इ. उपकरणांचीची उपलब्धता असल्याचे निविदाधारकाने प्रमाणित करुन त्याव्दारे सर्वेक्षण करणे अनिवार्य राहिल.

१० विद्युत जोडणी :- विद्युत जोडणीसाठी उद्भवाचे स्थळ ते अस्तित्वातील विद्युत पुरवठयाचे ठिकाण (Electric line) या मधील अंतराचा अंदाज घेऊन विद्युत जोडणीसाठी अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद ठेवावी. या करिता संबन्धित MSEDCL कडून कोटेशन प्राप्त करून घेण्याचे जबाबदारी संबन्धित संस्था / कंत्राटदार यांची राहील. उद्भव जागेच्या उपलब्धतेनुसार अंदाजपत्रकात सोलर सिस्टिमची (Off grid/ On grid) तरतूद ठेवण्यात यावी.

११ उद्भव विहीर अंदाजपत्रकात ट्रायल बोअर व उद्भवाची क्षमता चाचणीसाठी तरतूद ठेवण्यात यावी.

१२ तांत्रिक सल्लागाराकडे उपलब्ध असलेल्या खाजगी भूवैज्ञानिक कडून झालेल्या सर्वेक्षणाचा दाखला जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचेकडून प्रती स्वाक्षरी करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत तांत्रिक सल्लागाराची राहील. खालील नकाशे तीन प्रतीमध्ये सादर करणे अनिवार्य राहिल.
अ) Google Map
आ) Key Plan / Quarry chart(if applicable)
इ) L Section of Rising Main with T.P. results at 200m
ई) Distribution Map with nodes
उ) Flow Diagram
ऊ)Well Drawing Excavation profile
ऋ)Switch Room
क) Any other drawing as per scheme requirment
ल) उध्दरण नलिका L Section चे रेखाचित्र Drawing तयार करतांना Horizontal & Vertical Scale पुढील प्रमाणे घ्यावे. Vertical १ CM = ०.५०M Horizontal १ CM = ३०.० M

१३ उध्दरण नलिकेसाठी L Section प्रत्येक ३० मी. अंतरावर लेव्हल काढावे व तत्पुर्वी त्यानुसार सर्वेक्षण केलेले असावे.

१४ सर्वेक्षणाचे सर्व फिल्ड बुक व अंदाजपत्रकाची / संकल्पचित्राची (Design / Drawing) Soft Copy उपविभागीय कार्यालयात जमा करणे अनिवार्य असेल व ती जिल्हा परिषदेची मालमत्ता असेल.

१५ उद्भव विहिरीची जागेची भूवैज्ञानिक यांचे प्रमाणपत्र नोट कॅम मध्ये फोटो घेणे व साठवण टाकीसाठीप्रस्तावित जागेची नोट कॅम मध्ये फोटो घेणे व दोन्ही जागेमध्ये Google Map मध्ये नोंद करून नकाशा देणेअनिवार्य असेल.

१६ बांधकाम साहित्य वहन अंतर प्रमाणपत्र (Lead Certificate) अनिवार्य असेल.

१७ योजनेचे (Design) तयार करताना ती खालील बाबीच्या आधारावर असावीत :
अ) CPHEEO Manual मधील तांत्रिक निकषानुसार असावेत.
आ) वितरण व्यवस्था Bentely WaterGEMS / Epanet / Jaltantra / Branch या सॉफ्टवेअर च्या सहाय्याने Design करावे व आवश्यकते नुसार झोन करावे.
इ) उध्दरण नलिकेसाठी Economic size of rising main सोबत जोडावे.
ई) साठवण टाकी (ESR)12 तास क्षमतेसाठी संकल्पीत करावी.
उ) विद्युत पुरवठा उपलब्धतेनुसार Pumping Hours 12 तास घ्यावे (55 लि. दरडोई प्रमाणे)

ऊ) पाणी पुरवठा दर 55 लि. दरडोई दरदिवशी (५५ LPCD) असा घ्यावा.

ऋ) योजनेचे संकल्पन भविष्यातील 30 वर्षात वाढणारी लोकसंख्या गृहीत धरून काढावे.

१८ तांत्रिक मान्यतेची जबाबदारी संबंधित तांत्रिक सेवा पुरवठादार यांची राहिल.

१९ योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करताना जलजीवन मिशनच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ग्रामपंचायतकडून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची/पॅनलची राहिल.

२० योजनेतून JJM च्या निर्देशानुसार प्रत्येक महसुली गावातील प्रत्येक घरांना वैयक्तिक नळ योजणीव्दारे ५५ LPCD ने पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने योजनेची संकल्पन, आराखडे (Design/plan) करणे आवश्यक राहिल.

२१ DPR ला तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर त्यांचे ०३ सेट सादर करणे बंधनकारक राहिल.

२२ प्रस्तावित योजनेसाठी भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेने शिफारस केलेल्या प्रमाणपत्रानुसार निश्चित केलेल्या उदभवावरून सर्वेक्षण, संकल्पन व आराखडे अंदाजपत्रके तयार करण्याचे काम हाती घ्यावे लागेल. उद्भवबळकटीकरण उपाय योजना शिफारस असेल तर त्याची तरतूद अंदाजपत्रकात घेणेत यावी.

२३ संबंधित संस्थेस सर्वेक्षण व अंदाजपत्रक आराखडे तयार करण्यात येणाऱ्या कामाचे कार्यारंभ आदेश कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचेकडुन प्राप्त झाले नंतर काम हाती घेण्याची कार्यवाही करावी.

२४ सर्वेक्षणाच्या कामामध्ये प्रत्यक्ष जागेवर जाऊन गावातील संबंधित जागेचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. नकाशे व आराखडे तयार करणे, बाबनिहाय संकल्पन तयार करणे, जागेचा तपशिल दर्शवणारी किमान 3 छायाचित्रे घेणे, Field Book (Soft and Hard) सादर करणे, Auto Cad वर नकाशे तयार करुन त्याचे सह कलरप्रिंट आऊट 3 प्रतीत तयार करणे या बाबीचा समावेश असेल. तसेच Population forecasting, आवश्यक सर्व उपांगाचे CPHEEO मॅन्युअल व जलजीवन मिशनच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार संकल्पन तयार करून 3 प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. सदर सर्वेक्षणामध्ये पाईपलाईन खोदाईचा स्तर (Trial Pits) निश्चित करण्याची जबाबदारीसुध्दा संबंधित संस्था/व्यक्ती/पॅनेलची राहिल.

२५ सर्वेक्षणासाठी मागणी प्राप्त झाल्यानंतर मागणीनुसार सर्वेक्षण करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम संबंधित उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग ठरवतील. तसेच उप विभागीय अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग यांनी दिलेल्या सुचना व आदेश पाळणे संबंधित व्यक्ती/संस्थेस बंधनकारक राहिल. पाणी पुरवठा विभागाने ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमानसार काम हाती घेणे बंधनकारक राहिल.

२६ योजनेचे सर्वेक्षणाचे आदेश मिळालेपासून (15) दिवसाच्या आत सर्वेक्षण करून नकाशे, आराखडे व संकल्पन उपविभागात सादर करणे बंधनकारक राहिल.

२७ विहित मुदतीत कार्यवाही न झाल्यास प्रत्येक दिवसासाठी रू.200/- या प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. मुदत संपल्यानंतर 10 दिवसांत कार्यवाही पूर्ण न केल्यास अनामत रक्कम जप्त करून संबंधित व्यक्तीचे/संस्थेचे नाव पॅनलमधुन कमी करण्यात येईल व काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल.

२८ सर्वेक्षणासाठी आवश्यक असणा-या यंत्रसामग्री व उपकरणे इत्यादी प्रत्यक्ष साइटवर स्वखर्चाने नेण्याची /परत आणण्याची जबाबदारी पॅनलची राहिल.

२९ सर्वेक्षणासाठी लागणारा सर्व डाटा पॅनलने ग्राम पंचायत व ग्राम पाणी पुरवठा समिती व ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागाकडुन स्वत: उपलब्ध करून घ्यावयाचा आहे.

३० सर्वेक्षण करीत असताना स्वतंत्र लेवल नोंदवही ठेवणे त्यामध्ये आवश्यक त्या नोंदी घेणे व त्यानुसार Field Book तयार करुन सादर करणे पॅनलवर बंधनकारक राहिल.

३१ सर्वेक्षण करीत असताना घेतलेल्या लेव्हल्स तपासणी (Cross Verifications) संबंधित उप अभियंता करतील त्यात त्रुटी आढळल्यास पुन्हा सर्वेक्षण करावे लागेल व त्यासाठी येणारा जादा खर्च व्यक्ती /संस्था यांना मिळणार नाही.

३२ नियमाधिन करांची वसुली देयकातुन करण्यात येईल.

३३ योजना राबविताना येणा-या कायदेशीर अडचणी अथवा वाद उदभवल्यास त्यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. उस्मानाबाद यांचा राहिल. व त्यांचा अंतिम निर्णय संबंधितांवर बंधनकारक राहिल.

३४ सदर पॅनल व संस्थेस कोणतेही पूर्वसूचना न देता कोणत्याही क्षणी बरखास्त करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. उस्मानाबाद यांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. उस्मानाबाद यांचे मान्यतेने राहतील.

३५ निविदेत नमूद मंजूर दरानुसारच होणा-या कामाच्या देयकाची अदायगी करण्यात येईल.
३६ पाटबंधारे / रेल्वे खात्याच्या GTS Bench Mark वरून Fly levels carry करून त्यानुसार योजनेचे सविस्तर सर्वेक्षण करणे बंधनकारक राहिल.

| Activity | Date |
|---|---|
| Date of tender release and uploading of NIT and Tender Documents (online) by mail | 23-04-2022 |
| Last date of downloading and submission of Technical and financial proposal (online) by Mail | 03-05-2022 |
| Date of opening of Technical Bid | 04-05-2022 |
| Date of uploading of list of Technically qualified Bidders (online) | 05-05-2022 |
| Date of uploading of list of Financial qualified Bidders in the panel | 05-05-2022 |



# प्रपत्र - "अ"

**निवडीच्या गुणतक्त्याचे निकष :** अर्जदार तांत्रिक सल्लगार संस्था / कंत्राटदार खालील निकष पुर्ण करीत असली पाहीजे व तांत्रिक संस्था प्रमुखाने प्रस्तावा सोबत खालील कागदपत्राच्या प्रमाणीत (स्वाक्षरी व शिक्का) प्रती सादर करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | बाब | गुण |
|---|---|---|
| १. | अर्जदार तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांची नोंदणी किमान 0१ वर्षापुर्वीची असावी व नोंदणी पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. | १० |
| २. | अर्जदार तांत्रिक सल्लागार संस्थेचे / कंत्राटदार यांचे मागील 0१ वर्षाचे ताळेबंद (सन २०२१-२२) सोबत जोडणे आवश्यक आहे. | १० |
| ३. | तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार पॅन कार्ड | १० |
| ४. | तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार टॅन कार्ड GST प्रमाणपत्र | १० |
| ५. | मागील एका वर्षात DPR तयार करण्याचा कामाचा अनुभव<br>१) १० ऑर्डर पर्यत ०३ गुण<br>२) २० ऑर्डर पर्यत ०५ गुण<br>३) ३० ऑर्डर पर्यत १० गुण | १० |
| ६. | मागील 0१ वर्षाचे आर्थिक उलाढालीचे लेखापरिक्षक यांचे प्रमाणपत्र (सन २०२१-२२) | १० |
| ७. | नळ पाणी पुरवठा योजना संबधी सर्वेक्षण , संकल्पन, अंदाजपत्रक, सविस्तर प्रकल्प अहवाल इत्यादी कामाच्या अनुभवा बाबतचा किमान चार पानामध्ये सविस्तर अहवाल. (त्यात कामाचे ठिकाण, प्रकल्पाचे नाव, कालावधी, प्रकल्पाची किंमत, या कामी उपलब्ध केलेले मनुष्यबळ वापरण्यात आलेली कार्यपध्दती व प्रकल्पाचे मुख्य व्यक्तीचा बायोडाटा इत्यादी बाबीचा समावेश असावा.) | १० |
| ८. | तांत्रिक सल्लागार संस्थेचे / कंत्राटदार यांचे संकल्पनाचे तंत्रज्ञान हे शासनाने नमुद केलेल्या नळ पाणी पुरवठा योजना विषयीच्या शासन निर्णय, परिपत्रक, I.S. Code व C.P.H.E.E.O. यांचे मार्गदर्शक तत्वानुसार असणे बंधनकारक आहे. यासाठी एक T. S. प्राप्त अंदाजपत्रक सोबत जोडणे आवश्यक. | १० |
| ९. | तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराकडील कर्मचारी यांची किमान शैक्षणीक पात्रता D.C.E. / B.E. Civil असणे आवश्यक आहे. सदर अभियंता मागील 06 महिन्यापासून कार्यरत असल्याचे पुरावे जोडणी बंधनकारक आहे. | १० |
| १०. | तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचे कडे उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ व संसाधने | १० |

प्रपत्र अ मध्ये किमान 75 गुण घेतलेल्या तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराची निवड समिती मार्फत करण्यात येईल.

# परिशिष्ट - १

(नमुना सत्यप्रतिज्ञापत्र (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)

## सत्य प्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी --------- वय वर्षे ------------- राहणार ------------------ या सत्यप्रतिज्ञा पत्राव्दारे लिहून देतो की, मी ------------- ------------- या फर्म चा /कंपनीचा मालक असून ----- ---------- ----------- --- या कामासाठी आवेदनपत्र सादर करीत आहे. त्या आवेदन पत्रासोबत जी कागदपत्रे सादर केली आहेत ती खरी , बरोबर व पूर्ण आहेत, त्यामध्ये कोणत्याही त्रुटी, चुका नाहीत, याची मी खात्री केलेली असून असे शपथपूर्वक खालील अटी व शर्थीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रांमध्ये काही चुकीची, दिशाभूल करणारी, खोटी व तसेच अपूर्ण महिति आढळल्यास मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

1. जर कंत्राट कालावधी दरम्यान मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचा-यांनी ग्रामीण पाणी पुरवठाविभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद या कार्यालयास कोणतीही खोटी माहिति किंवा देयकासमवेत तसेच पत्रव्यवहारात खोटी / बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

2. जर कंत्राट कालावधी दरम्यान आणि काम समाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादरकेलेले कोणतेही कागदपत्रे खोटी / बनावट किंवा फसवी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गतकायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

3. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिति किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

**कंत्राटदाराची सही / शिक्का**

**जिल्हा परिषद, उस्मानाबाद**

**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. उस्मानाबाद**

**अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) फॉर्म**

**कामाचे नाव** :- जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामाकरीता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, सादरीकरण करणे, तांत्रिक मान्यता, प्रशासकिय मान्यता घेणे व कार्यारंभ आदेश निर्गमीत करणेसाठी तांत्रिक सल्ला व सहाय्य प्रदान करणे.

उपरोक्त नमुद केले नुसार सुचना दिनांक : २३/ ०४/ २०२२ ते दिनांक : ०३/०५/ २०२२ या कालावधीत https://zposmanabad.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी अटी व शर्ती प्रमाणे प्रात्र होत असलेल्या इच्छुकांनी आवश्यक ती कागदपत्रे ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद या कार्यालयास प्रत्यक्ष अथवा eebnosmanabad@gmail.com या मेल आयडी वर सादर करावीत.

**(अर्जुन च. नाडगौडा)**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद उस्मानाबाद**